MHND250007402025

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१०७/२०२५**
**आशा चव्हाण व इतर विरुध्द कोणी नाही**

## नि.१ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ मधील कलम २ अन्वये वारसा दाखला मिळणेसाठी सादर केला आहे.

**अर्जातील कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे :–**

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, **प्रशांत माधवराव चव्हाण** हे **दिनांक ३०.०८.२०२५** रोजी **बोळसा ता.उमरी जि.नांदेड** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र.१ ही मयत **प्रशांत माधवराव चव्हाण** यांची पत्नी, अर्जदार क्र.२ ही आई व अर्जदार क्र.३ व ४ हे मुले आहेत. मयत **प्रशांत माधवराव चव्हाण** यांना प्रस्तुत प्रकरणातील परिच्छेद क्र.१ मधील अर्जदार शिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार यांना कायदेशीर वारस असलेबाबत वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज दिला आहे.

३. प्रस्तुतचा अर्ज दाखल झाल्यानंतर दिनांक १०.१२.२०२५ रोजीचे 'दैनिक समिक्षा' या वर्तमानपत्रामध्ये नोटीस जाहीर करण्यात आली आहे. सदर वर्तमानपत्राची प्रत **(नि.०९/सी)** वर दाखल आहे. मयत **प्रशांत माधवराव चव्हाण** यांचे मृत्यू प्रमाणपत्र **(नि.५/६)** दाखल केले आहेत. अर्जदार यांनी त्यांचे व मयत यांचे आधार कार्ड **(नि. ५/१ ते ५/५)** येथे दाखल केले. अर्जदार यांनी त्यांचे सिधा पत्रीका **(नि.क्र.५/७)** येथे दाखल केलेले आहेत. अर्जदार यांनी त्यांचे वारसा प्रमाणपत्र **(नि.क्र.५/८)** येथे दाखल केलेले आहेत.

४. उपरोक्त वर्तमानपत्रामधील जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेकडून परिच्छेद क्र.१ मधील अर्जदार हे मयत **प्रशांत माधवराव चव्हाण** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत आक्षेप असलेस जाहीर प्रगटन काढून आक्षेप मागविणेत आले. परंतु, आजतागायत कोणीही

आक्षेप घेतलेला नाही.

५.            अर्जदार क्र.१ **आशा प्रशांत चव्हाण** यांनी **(नि.०६/सी)** कडे स्वतःकरीता व इतर अर्जदारातर्फे सरतपासाचे शपथपत्र दिले आहे. तसेच, अर्जदारातर्फे पुरावा देणे नाहीची पुरसीस दाखल केली आहे. त्यांचे शपथेवरील कथन खोटे आढळल्यास त्याबाबत ते शिक्षेस पात्र राहतील.

६.            उपरोक्त केलेल्या विवेचनाचा साकल्याने विचार करता परिच्छेद क्र.१ मधील अर्जदार हे मयत **प्रशांत माधवराव चव्हाण** यांचे कायदेशीर वारस असल्याचे सकृतदर्शनी सिद्ध झाले आहे. त्यामुळे, अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**आ दे श**

१) अर्ज मंजुर करणेत आला आहे.

२) अर्जदार क्र. **१. आशा प्रशांत चव्हाण, २. सावित्राबाई माधवराव चव्हाण, ३. वेदांत प्रशांत चव्हाण, ४. राजवीर प्रशांत चव्हाण** (परिच्छेद क्र.१) हे मयत **प्रशांत माधवराव चव्हाण** यांचे सरळ व कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

३) अर्जदारांनी प्रस्तुतच्या अर्जाच्या पृष्ठयर्थ योग्य ती कोर्ट फिस भरावी.

KULDIP SUBASHRAO KULKARNI

Digitally signed by KULDIP SUBASHRAO KULKARNI
Date: 2026.03.18 17:30:58 +0530

**(के.एस. कुलकर्णी)**
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
उमरी.

दिनांकः- १८.०३.२०२६.
ठिकाणीः- उमरी.

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | G. B. Wavdhane,<br>Stenographer Gr. III<br>(On Deputation) |
| Court | - | CJJD & JMFC Umri |
| Date | - | 18.03.2026. |
| Order signed by the Presiding Officer on | - | 18.03.2026. |
| Order uploaded on | - | 20.03.2026. |